admn17-18


MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२०१७/ 93 (शिक्षण)

दि. १८ ऑगस्ट,२०१७

## परिपत्रक

**विषय:- पदवी प्रवेश प्रक्रिया २०१७-१८**
**संकेतस्थळावर अपलोड न केलेल्या कागदपत्रांबाबत.**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.१५/६/२०१७ पासून सुरु झाली असून ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि.१०/७/२०१७ होता. यानंतर अंतरिम गुणवत्ता यादी दि. १५/७/२०१७ रोजी जाहीर करण्यात आली. यानंतर उमेदवारांना त्यांच्या तक्रारी ऑनलाईनद्वारे सादर करण्यासाठी दि.१९/७/२०१७ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, यानंतर विविध अडचणी नमूद करून प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्याबाबत कृषी परिषद कार्यालयाकडे विनंती अर्ज प्राप्त झाले होते.

उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून ज्या उमेदवारांनी विहित वेळेत प्रवेश अर्ज दाखल केलेला आहे आणि त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करूनही वाचनीय नसल्याने ग्राह्य धरण्यात आले नाहीत, किंवा अपलोड झाले नसल्याचे नमूद केले आहे, अशा उमेदवारांनी योग्य ती कागदपत्रे विनंती अर्जासोबत जोडली असल्यास ती स्वीकारण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार मे. केटीपीएल, पुणे यांना सूचित करण्यात आले आहे. यामुळे अशी कागदपत्रे संबंधित उमेदवारांच्या लॉग-इनमध्ये दिसून येत नाहीत.

यास्तव सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रवेश वाटप पत्रामध्ये नमूद केलेले गुण, प्रवर्ग व इतर बाबीनुसार उमेदवाराने सादर केलेली मूळ कागदपत्रे तपासून प्रवेश निश्चित करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

संचालक (शिक्षण)

प्रति,

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.
२. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, सर्व महाविद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदर परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.